THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 22ND NOVEMBER 1894.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

## हिंदुस्थान सरकार.

### लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांचा खालीं लिहिलेला आक्ट आलीजनाब गव्हर्नर जनरल ह्यांनीं तारीख १८ माहे आक्टोबर सन १८९४ रोजीं मंजूर केला; तो लोकांस जाहीर होण्यासाठीं ह्यावरून प्रसिद्ध केला असेः—

### सन १८९४ चा आक्ट १५ वा.

**आगबोटींच्या एन्जिनियरांस दिलेले विवक्षित दाखले कायदेशीर ठरविण्यासाठीं आक्ट.**

ज्या अर्थी, सन १८७३ चा आगीच्या गलबतांच्या पाहाणींत सुधारणा करण्याकरितां आक्ट हा सन १८८४ चा देशांतील आगीच्या गलबतांविषयींचा आक्ट ह्याअन्वयें रद्द करण्यांत येऊन, तो सन १८८४ चा आक्ट मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल ह्यांच्या अमलांतल्या मुलुकामध्यें तारीख १ माहे डिसेंबर सन १८८९ रोजीं अमलांत आला,

आणि ज्या अर्थी सदर्हू दिवस व तारीख ७ माहे फेब्रुवारी सन १८९३ ह्यांच्या दरम्यान, सदर्हू सन १८७३ चा आगीच्या गलबतांच्या पाहाणींत सुधारणा करण्याकरितां आक्ट ह्याखालील कानूंस अनुसरून आणि सन १८८४ चा हिंदुस्थानी आगबोटींविषयींचा आक्ट ह्याच्या ठरावांकडे दुर्लक्ष्य होऊन मुंबईमध्यें "हिंदुस्थानचे परमुलकी व्यापारासंबंधीं लायकीचे दाखले" ह्या नांवाचे कांहीं दाखले गफलतीनें देण्यांत आले,

आणि ज्या अर्थी सदर्हू दाखले कायदेशीर ठरविणें योग्य आहे,

त्या अर्थी खाली लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे :—

सरनामा व सुरुवात.

१. (१) ह्या आक्टास सन १८९४ चा एन्जिनियरांचे दाखले कायदेशीर ठरविण्याकरितां आक्ट असें म्हणावें; आणि

(२) तो एकदम अमलांत येईल.

मुंबईमध्यें आगबोटींच्या एन्जिनियरांस दिलेले "हिंदुस्थानचे परमुलकी व्यापारासंबंधीं लायकीचे दाखले" कायदेशीर ठरविणें.

२. तारीख १ माहे डिसेंबर सन १८८९ व तारीख ७ माहे फेब्रुवारी सन १८९३ (दोन्ही दिवस धरून) ह्यांच्या दरम्यान मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल ह्यांच्या अधिकाराअन्वयें "हिंदुस्थानचे परमुलकी व्यापारासंबंधीं लायकीचे दाखले" ह्या नांवाचे जे दाखले, आगबोटींच्या एन्जिनियरांचें काम करण्याची धारण करणाऱ्या मनुष्यांची लायकी दर्शविण्यासाठीं, देण्यांत आले होते, ते सन १८८४ चा हिंदुस्थानी आगबोटींविषयींचा आक्ट ह्याअन्वयें देण्यांत आले आहेत असें समजलें पाहिजे, आणि ते ज्या वर्गांच्या सफरींच्या संबंधानें दिले होते, त्या वर्गांच्या सफरींसाठीं कायदेशीर आहेत असें समजलें पाहिजे; मात्र इतकेंच कीं, ह्यांतल्या कोणत्याही ठरावावरून अशा दाखल्यावर इतर कोणत्याही प्रकारचा परिणाम घडून येतो असें समजूं नये.

(सही) जे. एम्. म्याक्फर्सन,
डेप्युटी सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True Translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.